प्रकरण ४ थे

संस्कृत भाषेचे गतवैभव सध्याची दुरवस्था आणि इतर भाषांचा शैलीवर परिणाम

प्रकरण ४ थे

संस्कृत भाषेचे गतवैभव व सध्याची दरवस्था आणि इतर भाषांच्या शैलीवर परिणाम

संस्कृत भाषेचे प्राचीन वैभव, राजभाषा म्हणून एकेकाळी असलेलेतिचे मानाचे स्थान, परकीयांनीदेखील तिचे महत्त्व ओळखून केलेले अध्ययन या सर्वांचा विचार करता; सर्व भारतीयांनाच नव्हे तर जगातील इतरही अनेक देशांना जी आदरणीय, वंदनीय, आणि अभ्यासनीय वाटली त्या आमच्या संस्कृत भाषेचे गतवैभव वर्णन करणा-या काव्यांची निर्मिती अर्वाचीन संस्कृत कवींनी केलेली आहे. त्याप्रमाणे संस्कृतची सध्याची दयनीय अवस्था पाहून खेद व्यक्त करणारी आणि संस्कृतची ही अवस्था नाहीशी करुन तिला पुन्हा गतवैभव, मानाचे स्थान मिळवून देण्यासाठी करावयाची उपाययोजना सांगणारी काव्येही निर्माण झाली व अजूनही होत आहेत. संस्कृत ही आमची स्वभाषा आहे की, ज्यामध्ये प्राचीन परंपरा व संस्कृती यांचे दर्शन झाले आहे. ती राष्ट्रभाषा म्हणून पूजनीय आहे.

अर्थात केवळ साहित्याव्दारेच संस्कृत प्रचारकार्य सुरु आहे असे नव्हे, तर "देववाणी मंदीर" सारख्या संस्था संस्कृतप्रचारार्थ प्रत्यक्ष विविध कार्यक्रमही करतात. लोकांच्या मनामध्ये संस्कृत विषयाची आवड निर्माण व्हावी. यासाठी अनेक संस्कृतप्रेमी लोक, संस्था कार्यरत आहेत. याकामी आकाशवाणी, दूर-चित्रवाणी यांचाही उपयोग करुन घेतला जात आहे.

तेव्हा आता येथे संस्कृत भाषेचे गतवैभव, तिचे माहात्म्य वर्णन करणारा तसेच संस्कृतची दयनीय अवस्था वर्णन करणा-या आणि त्यावरील उपाययोजना सुचविणा-या काव्यांचा आढावा घेत आहे.

- प्रश्नावलीविमर्श:

- डॉ. श्री. भा. वर्णेकर

इ.स. 1955 मध्ये भारत सरकारने संस्कृत भाषेच्या स्थितीचे सर्वेक्षण करण्यासाठी तसेच संस्कृतचा प्रसार करण्यासाठी एक संस्कृत आयोग स्थापन केला होता. या आयोगाने तेहेतीस प्रश्नांची एक प्रश्नावली तयार करुन संपूर्ण देशभर पाठवून उत्तरे मागविली होती. त्यावेळी डॉ. वर्णेकर नागपूरमध्ये "भवितव्यम्" नावाचे संस्कृत साप्ताहिक चालवित होते. त्यांनी "भवितव्यम्" मध्ये अत्यंत विचारपूर्वक, अभ्यासपूर्ण अशी या प्रश्नांची उत्तरे लिहिली. नंतर 1957 मध्ये त्यालाच स्वतंत्र पुस्तकाचे स्वरुन देवून "प्रश्नावलीविमर्श:" या नावाने ते प्रसिध्द केले.

जरी "प्रश्नावलीविमर्श" हे पुस्तक संस्कृत भाषेच्या प्रचाराच्या प्रश्नांशी संबंधित असले तरी डॉ.वर्णेकरांनी यातून देखील राष्ट्रीय भावना उत्कृष्ट प्रकारे जागृत केलेली आहे. त्यांच्या मते राष्ट्रीय भावनेचा संबंध सरळ सरळ तिथल्या संस्कृतीशी असतो.आणि संस्कृतीची अभिव्यक्ती तेथील भाषा वैशिष्टांनी होते. त्यामुळे अशा परिस्थितीत एखाद्या ठिकाणी राष्ट्रीय भावना जागृत राखण्यासाठी तेथील संस्कृती सुरक्षित ठेवली पाहिजे. आणि संस्कृतीच्या सुरक्षिततेसाठी ती संस्कृती ज्या भाषेच्या माध्यमातून ज्ञात होते. ती भाषा प्रचारात असणे अत्यंत गरजेचे असते. ज्या राष्ट्राच्या भाषेविषयी तेथील लोकांच्या मनात उपेक्षा उदासिनता,आणि हीनता असते ते राष्ट्र आपली संस्कृती,आपला गौरव हरवून बसते. दुर्दैवाने आपल्या भारत-देशाच्या बाबतीत नेमके हेच घडते आहे. आपल्या भारताची संस्कृती, की जी विश्वामध्ये सर्वश्रेष्ठ मानली जाते;ती संस्कृती संस्कृत भाषेमध्ये बध्द आहे आणि हे माहीत असूनही भारताचे नेते संस्कृत भाषेविषयी उदासिनता, उपेक्षा आणि हीनता मनामध्ये बाळगून आहेत. याचा परिणाम म्हणजे भारतीय संस्कृतीचा गौरव क्षणोक्षणी नष्ट होत आहे. लोकांच्या मनातील भारतीयतेविषयीचा स्वाभिमान दिवसेंदिवस नष्ट होत चालला आहे. कारण राष्ट्रीय भावनेचा बोध करुन देणा-या संस्कृतपासून येथील लोक वंचित होत आहेत आणि अशीच परिस्थिती राहिली तर भारतातील रहिवाशांच्या मनात भारताविषयी कसलीही आस्था कसलेही प्रेम उरणार नाही;आणि आपले राष्ट्र छिन्नभिन्न होण्यास वेळ लागणार नाही.म्हणूनच आपले राष्ट्र,राष्ट्रीयता आणि राष्ट्रीय भावना यांच्या रक्षणासाठी,संवर्धनासाठी आपली संस्कृती समजून घेणे अत्यंत आवश्यक आहे. इतकेच नव्हे तर त्या संस्कृतीशी एकरुप होणे अपरिहार्य आहे.आणि त्यासाठी या संस्कृतीचे एकमात्र माध्यम,साधन आणि उत्तेजन अशी संस्कृत भाषा शिकणे गरजेचे आहे.यासाठी संस्कृतचा प्रचार केला पाहिजे.

"प्रश्नावलीविमर्शः" या पुस्तकात आलेली काही सुभाषिते आणि त्यांचे भावार्थ पुढीलप्रमाणे-

१) " यत्र राष्ट्रे तद्धुरीणाः स्वीयां परम्परागतां संस्कृतिं
न सम्यक विजानन्ति, तत्तद् राष्ट्रं विनाशगर्ते निपतति ।"[1]

- ज्या राष्ट्राचा कर्णधार आपली परंपरागत संस्कृती नीटपणे जाणत नाही ते राष्ट्र विनाशाच्या गर्तेत पडते.

२) राष्ट्रियत्वं जागरणं हि शिक्षायाः प्रधानहेतुषु अग्रगण्यो हेतुः ।[2]

- लोकांच्या मध्ये राष्ट्रीय भावना जागृत करणे हेच शिक्षणाच्या उद्देशांमध्ये अग्रगण्य मानले जाते.

§ "संस्कृताध्ययनेन भारतीयानां राष्ट्रियत्त्वं जागर्ति ।"[3]

– संस्कृत भाषेच्या अध्ययनाने भारतीय जनतेमध्ये राष्ट्रीय भावना निर्माण होते.

§ "राष्ट्रियत्त्वजागरणार्थं संस्कृतद्रोहं परित्यज्य संस्कृताध्ययने दत्तचित्तैः भवितव्यम् ।"[4]

– आपल्या मनामध्ये राष्ट्रीय भावना जागृत करण्यासाठी संस्कृत भाषेशी द्रोह न करता अध्ययन करण्यात चित्त लावावे.

§ "संस्कृतं भारतीयराष्ट्रजीवनस्य प्राणभूतं तत्त्वम् ।"[5]

– संस्कृत भाषा भारतीय राष्ट्रजीवनाचे प्राणभूत तत्त्व आहे.

§ "तावदेव प्रतिष्ठा स्याद् भारतस्य महीतले ।
ज्ञानामृतमयी यावत् सेव्यते सुरभारती ।।"[6]

– जगामध्ये भारताची प्रतिष्ठा तेव्हाच होईल,जेव्हा येथे ज्ञानामृतमयी संस्कृत भाषेचा सर्वजण अभ्यास करतील.

– किमर्थं संस्कृतम् ? –

– संपादक श्री. श्रीराम वेलणकर.

"संस्कृत भाषेचा तुम्ही प्रचार कशासाठी करता ? संस्कृत अध्ययनाचा फायदा काय?"असे प्रश्न विचारणा-या लोकांना संस्कृतचे महत्त्व पटवून देण्यासाठी,संस्कृतची थोरवी गाण्यासाठी श्री श्रीराम भि. वेलणकर यांनी "किमर्थं संस्कृतम् ?" हे पुस्तक संपादित केले. या पुस्तकामध्ये स्वातंत्र्योत्तर काळामध्ये भारतात संस्कृतची जी पिछेहाट झाली. त्याच्या कारणांची चर्चा केली आहे. त्याचप्रमाणे संस्कृतचे अध्ययन कशासाठी करावयाचे? संस्कृतच्या प्रसारासाठी कोणती उपाययोजना करावी ? यासंबंधीचे लेख आहेत. या पुस्तकातील महत्त्वाचा उल्लेखनीय भाग म्हणजे या पुस्तकाच्या शेवटी उद्घृत केलेली विविध परदेशी विद्वानांची संस्कृत व भारतीय संस्कृतीविषयीची प्रशंसनीय मते.

"संस्कृत भाषेचा प्रचार करणे"या मुख्य हेतूनेच वेलणकरांनी हे पुस्तक संपादित केले आहे. वेलणकरांची संस्कृतवरील निष्ठा तर यातून व्यक्त होतेच शिवाय भारतीय संस्कृतीचा त्यांना असलेला अभिमानही दिसून येतो.

स्वातंत्र्योत्तर काळात संस्कृतचे अध्ययन करण्याची आवश्यकता नाही असे मत रूढ झाले होते. पाश्चिमात्य शिक्षणाच्या अनुकरणाची आवड निर्माण झाल्याने संस्कृतची पिछेहाट सुरु झाली. शैक्षणिक अभ्यासक्रमातून संस्कृतची काही ठिकाणी पूर्ण हकालपट्टी झाली तर काही ठिकाणी पर्यायी स्वरूपात संस्कृत

शिल्लक राहिले.

लोकांचे असे मत दिसून येते की, उदरभरणासाठी बाकीचे विषय ज्याप्रमाणे उपयुक्त ठरतात त्याप्रमाणे संस्कृतचा उपयोग होत नाही. परंतु आता हा गैरसमज दूर होण्यास सुरुवात झाली आहे. संस्कृतचे महत्त्व ती आपली भाषा असूनही आपण ओळखले नाही. परंतु पाश्चात्य विद्वानांनी ओळखले आहे. प्राचीन वैदिक संस्कृत साहित्यामध्ये असलेले ज्ञानभांडार त्यांनी शोधून काढले. अजूनही नवनवीन संशोधन चालू आहे. इतकेच नव्हे तर संगणकासाठी सर्वात योग्य भाषा संस्कृत असल्याचे मत व्यक्त केले जात आहे. नृत्य, संगीत, शिल्प वगैरे कला विविध शास्त्रे यांचे मूळ वैदिक वाङमयात सापडत आहे. म्हणून वेलणकरांच्या मते –

"संस्कृते जीवनाधारं ज्ञानं विज्ञानमेव च ।
तस्मात् संस्कृतमध्येयं माऽपवादोऽस्तु निश्चितम् ।।"[7]

"राष्ट्रिय शिक्षा नीत्यां संस्कृतम्" या लेखात डॉ मो. दि. पराडकर यांनी संस्कृत अध्ययन अध्यापनाविषयी आपेल मत व्यक्त करताना म्हटले आहे की, केवळ माध्यमिक शाळेतच नव्हे तर प्राथमिक पासूनच संस्कृतचे अध्ययन आवश्यक आहे. कारण संस्कृत भाषा ही राष्ट्रीय एकात्मता वृध्दिंगत करणारी आहे. ती राष्ट्रीय शिक्षण देणारी भाषा आहे.

संस्कृत शिकणा-या विद्यार्थ्यांची अल्प संख्या चिंताजनकच नव्हे तर विषाद निर्माण करणारी असल्याचे मत त्यांनी व्यक्त केला आहे. संस्कृत विषयाची शैक्षणिक अभ्यासक्रमातील आवश्यकतेबरोबरच संस्कृत संगीत स्पर्धा, पथनाटयप्रयोग, संभाषण वर्ग, आकाशवाणीवरील संस्कृतमंदाकिनी, गीर्वाणवाणीसारखे, दूरचित्रवाणीवरील अमृतमंथनासारखे कार्यक्रम, देववाणी मंदिरासारख्या संस्कृतप्रेमी संस्थांनी हाती घेतलेले कार्यक्रम या सर्वांमधून लोकांना संस्कृत साहित्याचा परिचय होऊन त्यातील ज्ञानप्राप्तीची इच्छा निर्माण होऊन लोक संस्कृत अध्ययनाकडे वळू लागलेले दिसत आहेत.[8]

" किमर्थं संस्कृतम् " या लेखात डॉ. ग. मो. पाटील यांनी संस्कृत अध्ययनाच्या आवश्यकतेची कांही कारणे दिली आहेत,[9] ती पुढीलप्रमाणे –

1. " शिलालेख, मूर्तिशिल्प, वास्तुशिल्प यांच्यावरील लेख बहुतांशी संस्कृत भाषेत असतात. त्यांच्या आधारे तत्कालीन भारतीय संस्कृतीचे ज्ञान होऊ शकते. त्यामुळे संस्कृत ज्ञानाची गरज असते."
2. भारतीय दर्शन परंपरेचे सम्यग् ज्ञान अनुवादित ग्रंथांपेक्षा मूळ संस्कृत ग्रंथवाचनाने होणे शक्य असल्याने संस्कृतचे अध्ययन आवश्यक आहे.
3. धर्म, तत्त्वज्ञान, भाषा वगैरेचा तौलनिक अभ्यास करण्यास संस्कृतचा उपयोग होतो.
4. उच्चारशुध्दता ही संस्कृत पठणामुळेच येऊ शकते.

5. भारतीय भाषांच्या प्रगल्भतेसाठी, समृध्दीसाठी संस्कृत उपयुक्त आहे.

6. भाषाशुध्दी, स्मरणशक्तीचा विकास, शुध्दलेखन यासाठी संस्कृतचा उपयोग होतो.

7. मातृभाषेतील निबंधलेखन, वक्तृत्व, प्रभावी व्हावे यासाठी संस्कृतमधील सुभाषिते, न्याय यांचा उपयोग होतो

" संस्कृतं स्वोन्नतिकारकम् " या लेखात मुंबईच्या डॉ. न. ब. पाटील यांनी राजभाषेविषयीचे मत मांडताना म्हटले आहे.

आपला भारत देश बहुभाषिक आहे. येथे 179 भाषा आणि 544 बोली भाषा आहेत. त्यातील "हिंदी"ही राष्ट्रभाषा तर "इंग्रजी"ही राजभाषा आहे. परकीय इंग्रजी भाषेला "राजभाषे"चा मान देणे हे डॉ. पाटील यांच्या मते स्वराज्याचे लक्षण मानताच येणार नाही.[10]

संस्कृतच्या प्रचारार्थ डॉ पाटील यांच्या मते, इ.5 वी ते इ.7 वी पर्यंत 50 गुणांचे आणि इ.8 वी ते इ.10 वी 100 गुणांचे संस्कृत ऐच्छिक स्वरुपात ठेवावे.

स्वतःच्या उन्नतीला कारणीभूत ठरणाऱ्या संस्कृतविषयी इतर राज्यांच्या मानाने महाराष्ट्रात असलेला दर्जा पाहून त्यांनी खेद व्यक्त केला आहे.[11]

याच पुस्तकात संस्कृत अध्ययनाचे महत्त्व सांगणारी श्री. वेलणकरांची सुरेख कविता आहे. ती येथे उद्धृत करणे अनुचित ठरणार नाही.

"अस्मत्संस्कृतिरक्षार्थं भुवने तत्प्रसारकम् ।
अध्येयं संस्कृतं सर्वैः आबालस्थविरैः सदा ।। 1 ।।
मातृभाषासमृध्दयर्थं तदुपोब्दलकं हि यत् ।
अध्येयं संस्कृतं सर्वैः सर्वदा चाविलम्बितम् ।।2।।
चारित्र्यनिर्मितौ यस्मात् साधनं सर्वतोमुखम् ।
अध्येयं संस्कृतं सर्वैः भारतीयैरनारतम् ।।3।।
अखण्डतारक्षणार्थं भारतस्य निरन्तरम् ।
अध्येयं संस्कृतं सर्वैः अनालस्यं दिवानिशम् ।। 4 ।।
विश्वस्य भूत्यै सर्वत्र सर्वार्थं जीवनप्रदम् ।
अध्येयं संस्कृतं सर्वैः विश्वकल्याणकारि तत् ।। 5 ।।
शिक्षानीतौ नवनीयां संस्कृतं नास्ति रक्षितम् ।
अध्येयं संस्कृतं सर्वैः तस्मात् पाठ्यक्रमाद् बहिः ।। 6 ।।

लोकानुकूल्यं प्राप्तव्यं संस्कृतार्थं प्रचारकैः ।

अध्येयं संस्कृतं सर्वैः अध्याप्यं शिक्षकैस्तथा ।।7।।

अध्यापयेत् न यः शक्तः योऽधीयात् च न संस्कृतम् ।

स राष्ट्रशत्रुर्मन्तव्यः संभाविप्रगतेः पथे ।। 8 ।।

याच पुस्तकात प्राचीन भारतीय संस्कृती आणि प्राचीन संस्कृत वाङ्मयाविषयी अनेक परदेशी विद्वानांची मते उद्धृत केली आहेत. ती जशीच्या तशी येथे घेत आहे. त्यावरून पाश्चात्य विद्वानांच्या मनात संस्कृत भाषेविषयी नेमक्या कोणत्या भावना होत्या हे तर आपल्याला समजतेच. शिवाय संस्कृत भाषेतील ज्ञान भांडाराचा त्यांना लागलेला शोध, ते ज्ञान मिळविण्यासाठी त्यांनी केलेल्या प्रयत्नांची माहिती होते. तेव्हा प्राचीन भारतीय संस्कृतीविषयी विद्वानांचे अभिप्राय [12]

§ "विश्वेतिहासे वेदवाङ्मयेन या त्रुटिः परिपूर्यते सा न कस्याः अपि अन्यस्या भाषाया वाङ्मयेन परिपूरणीया भवति ।"

– प्रो. मॅक्स मुल्लर-इंडिया व्हाट इट कॅन टीच अस.

§ "ऋग्वेदस्य उदात्तसरलता उच्चतत्त्वदृष्टिश्च प्राचीनकालस्य उत्कृष्टं तत्त्वज्ञानं प्रदर्शयतः ।"

– प्रो. डयूसेन

§ "मया पठितानि वेदवचनानि उच्च शुध्द–धारा प्रकाशवत् मां स्नपयन्ति ।"

– थोरो

§ "ऋग्वेद मानवस्य उच्चतमाःपन्थानः गभीरतया संकल्पिताः ।"

– प्रो. गुड्गोल्ट

§ "अहं मन्ये यस्य स्वकृते, निजपूर्वजकृते, स्वीयेतिहासकृते, आत्मबुद्धिसंवर्धनकृते स्पृहास्ति तस्य ऋग्वेदाध्ययनम् अवश्यमिति ।"

– प्रो मॅक्समुल्लर

§ "संस्कृतवाङ्मयाभ्यासेन महता प्राचीन राष्ट्रेण परिचयः भवति । ज्ञानस्य सर्वाः शाखाः तेन आत्मसात् कृता आसन् । मानव– संस्कृति–इतिहासे च तद्राष्ट्रस्य स्थानविशेषः अपरिहार्य एवं ।"

– काउन्ट जेर्नसजेर्ना

§ "संस्कृतंवाङ्मयं निर्विवादम् उच्चसुसंस्कृत जनानामेवं शक्यम् ।

प्राच्यां महाज्ञानिनां इयं भाषा ऽसीत् इति सकारंणं मन्यामहे । इदं वाङ्मयं यथा शास्त्रीयं तथैव काव्यमयम् । इदं गद्यपद्यमयं अतीव श्रीमद् वाङ्मयं वर्तते।"

– प्रो. हिरेन, हिस्टॉरिकल रिसर्चर.

§ "प्राचीन भारतीयपण्डितैः ईदृशविभिन्नविषयेषु
वाङ्मयं विरचितं यत् सर्वे शास्त्रीयविषयाः
तैः अवगता इति प्रतिभाति । यथा च एते विषयाः
चर्चिताः तथा अवगम्यते ते एतेषु विषयेषु
सर्वजगद्धुरीणा एव । तेषां तत्त्वज्ञानग्रन्थाः
धर्मशास्त्रग्रन्थाश्च तेषां गहनपाण्डित्यं प्रत्याययन्ति ।"

– डब्ल्यूवार्ड.

§ "भारतीयप्राचीनवाङ्मयस्य एकविषयाध्ययनार्थमपि मानवायुः अपार्यप्तमेव ।"

– सर विल्यम जोन्स

§ "कालिदासेन न केवलं भारतं संमानितं अपि तु सकला मानवजातिः संमानिता ।

– प्रो. हीरेन.

§ "भारतात् अरबैः बीजगणितं प्राप्तम् । अंकप्रगणिधिः दशमानलेखनं च युरोपखण्डे अधुना वर्तमाने अपि तत एव निष्पन्ने । गणितप्रगतिः तत एव सर्वत्र संजाता ।

– सर मोनिअर विल्यम्स.

§ " कथावाङ्मयविरचने प्राचीनभारतीयाः सर्वमानवजातेः ननु प्राध्यापका एव ।

– माउन्ट स्टु एल्फिन्स्टन

§ " पाणिनेः व्याकरणं सर्वव्याकरणेषु श्रेष्ठम् । निःसंदिग्ध विधाने धातुविश्लेषणे शब्दनिरुक्तिनियमे च न तत्समं कुत्र किमपि वर्तते ।

– सर वि. हन्टर

ही सर्व मते वाचणाऱ्याच्या मनात निश्चितच संस्कृत भाषेविषयी, आमच्या प्राचीन वाङ्मयाविषयी, संस्कृतीविषयी आदर वृध्दिंगत होईल. आमच्या विश्ववंद्य संस्कृतीने परिपूर्ण राष्ट्राचा आम्हाला अभिमान निश्चतच वाटेल.

अशा प्रकारे वाचकांच्या मनात स्वभाषा, स्वसंस्कृती आणि स्वराष्ट्राभिमान निर्माण करणारे हे पुस्तक आहे.

- संस्कृतभाषा -

श्री.श्री.भि.वेलणकर

संस्कृत भाषेची महती सांगणा-या पंचवीस कवितांचा हा संग्रह आहे. यामध्ये संस्कृत विषयीच्या आपल्या भावना श्री.वेलणकरांनी व्यक्त केल्या आहेत. या सर्वच कवितांमधून त्यांचे स्वराष्ट्र-भाषेवरील प्रेम प्रकट होते.

प्रथम संस्कृत भाषेला वंदन करणारी " नमो स्तु संस्कृत" ही कविता आहे. या कवितेत अतिशय मोजक्या शब्दात संस्कृतची वैशिष्ठये सांगून तिच्या ज्ञानभांडारची ओळख करून दिली आहे. स्फूर्तिप्रद व्यास,वाल्मीकींना वंदन केले आहे. जगताचा उध्दार करणारी,विश्वविहार करणारी, विश्वाने जिचा पुरस्कार केला आहे अशी ही संस्कृत देववाणी आहे. कवीच्या शब्दात सांगावयाचे तर-

" नमो स्तु संस्कृत । विश्वपुरस्कृत । त्वं साहित्याचरणी ।
अमराविष्कृत । शास्त्रपरिष्कृत । संपुनज्मि पाणी ।।
जगदुध्दरणी विविहरणी दुष्कमपरिहरणी ।
विद्याभरणी समाजधरणी निपुणदेववाणी ।।[13]

" आशा संस्कृते " या कवितेत श्री.वेलणकरांनी आता भारत स्वतंत्र झाला आहे. तेव्हा या देवभाषेची वृध्दी होईल अशी आशा व्यक्त केली आहे. संस्कृत भाषा अतिप्राचीन आहे. ऋषीमुनींनी तिची साधना केली आहे. पुन्हा ती पुर्ववत प्रसारीत होऊन सर्व लोकांच्या वृत्ती फुलवीत अशी आशा कवीने व्यक्त केली आहे. एवढेच नव्हे तर आमची भारतभूमी पुन्हा प्रबल ठरेल अशी आशाही व्यक्त केली आहे.[15]

भारतामध्ये संस्कृतची परंपरा प्राचीन आहे. संस्कृतमध्ये वेद,उपनिषदे,गीता,सूत्रवाङमय स्त्रोत्रे,धर्मशास्त्रांवरील ग्रंथ,कलाशास्त्र पूजा,व्रतवैकल्ये यांची माहिती सांगणारे ग्रंथ,पुराणे,आहार-विहारादि शास्त्रे असलेला आयुर्वेद अशा अनेक विषयाचे ज्ञान संगृहीत आहे.[16]

भारतामध्ये विविध तत्त्वज्ञानप्रवाहांचा ओघ वाहता आहे. चार्वाक,बौध्द,जैन,सांख्य वेदांत अशा विविध मार्गीयांनी आपापल्या तत्त्वज्ञानाने संस्कृत भाषेला परिपुष्ट केले आहे. ही गोष्ट " अभिवृध्दी:" या कवितेत श्री.वेलणकरांनी दाखवून दिली आहे.[17]

संस्कृत भाषेचा परकीयांनीदेखील गौरव केला. त्यातील ज्ञानभंडार ओळखून तिचे सखोल अध्ययन केले. संस्कृतमधील वैदिक तसेच विदग्ध वाङ्मयाचा आपापल्या मातृभाषेमध्ये अनुवाद केला. संस्कृतच्या अध्ययनाला परकीयांनी दिलेले उत्तेजन, संस्कृतचे केलेले गौरवगान निश्चितच भारतीयांना अभिमानास्पद आहे. अखंडता टिकविण्यासाठी संस्कृत अत्यंत उपयुक्त आहे. राष्ट्रवर्धनातही संस्कृतचा सिंहाचा वाटा आहे. हे "अखंण्डताप्रेरणम्" या कवितेत वेलणकरांनी सांगितले आहे.[18]

संस्कृत भाषेला भारतीय राज्यघटनेत प्रादेशिक भाषांच्या ओळीत बसविलेले पाहून कवीचे मन व्यथित झाले आहे. राष्ट्रभाषा होण्याची जिची पात्रता, तिला तिच्या मानाच्या स्थानापासून वंचित केले हा राज्यघटना समितीने संस्कृतवर केलेला जबरदस्त घाव आहे. असा खेद वेलणकरांनी " पदापहार " या कवितेत व्यक्त केला आहे.[19]

"समितिर्दुष्करकृति:" या कवितेत कवीने शैक्षणिक अभ्यासक्रम समितीने जे त्रिभाषासूत्र अवलंबून संस्कृतला गौणस्थान दिले. त्याबददल नाराजी व्यक्त केली आहे.[20]

" सर्वासां भाषाणां माता अखण्डनवशाब्दान्या जनिता कथं न राष्ट्रे तत्र
प्रथमता न च बुध्दे: संगति: ।।"[21]

या पुस्तकातील सर्वच कवितांमधून श्री. वेलणकरांचे संस्कृत भाषेवरील प्रेम व्यक्त होते. त्याचबरोबर भारतीय संस्कृती, धर्म यांच्याविषयीचा अभिमानही व्यक्त होतो. संस्कृत प्रचाराची त्यांची प्रामाणिक तळमळ दिसून येते. संस्कृतला पुन्हा पूर्वीचे स्थान प्राप्त व्हावे, संस्कृतचा सर्वत्र प्रसार व्हावा म्हणून संस्कृतसाहित्यसेवेबरोबरच विविध उपक्रमांच्या साहाय्याने संस्कृतप्रचार करण्यात ते कार्यरत असतात.

"गीर्वाणवाणी"ची "सुरवाणी" ला तिचे पूर्वीचे स्थान प्राप्त होवो. गीर्वाणवाणी ची त्यांची सेवा फळाला येवो. आणि पुन्हा आपल्या या सुखाणीला तिचे पूर्वीचे स्थान प्राप्त होवो.

- भ्रान्तभारत -

" भ्रान्तभारत" नाटकाचे लेखक "गोकुळदास तेजपाल संस्कृत महाविद्यालय, मुंबई" येथील पुढील विद्यार्थी आहेत. (1) व्याकरणाचार्य काव्यतीर्थ नागेश पंडित (2) व्याकरणशास्त्री- काव्यतीर्थ शालिग्राम द्विवेदी आणि अच्युत पाध्ये

1986 मध्ये एका सत्कार समारंभात याचा प्रयोग देखील त्यांनी केला आहे.

या नाटकाच्या लेखकांची अशी धारणा आहे की, आधुनिकतेच्या नावावर भारत भ्रष्ट होऊ लागला आहे. नांदीमध्ये हा आशय व्यक्त केलेला आहे.

" मातस्त्वदीय चरणौ शरणं सदास्तु भ्रान्तस्य भद्रविमुखायतभारतस्य ।
यत्संगतोऽभवदिदं सुरराज्य पूज्यं वर्षं विमोह इति राजनिवासभूमिः ।।"

नाटकाच्या सुरवातीला नारदमुनी रंगमंचावर येतात ते आधुनिकतेकडे झुकणाऱ्या प्रगत भारताचे चित्रण करतात. त्यांच्या प्राचीन संस्कृतीचा नाश होतअसून इंग्रजानुकरणाच्या प्रवाहाच्या लाटेचे वर्णन करतात.

" जातं यद्वशजातं जगदिदमुग्रतरं चोत्तपते स्वदते तद्विद्याया वृध्दिं संस्कृतविद्यां हसते ।
मूढोऽभयंभयमिव मनुते । "

वास्तविकता चांगल्या प्रकारे जाणणारा नारद शिष्य स्पष्टच म्हणतो-

" पर्वतो वाथ पुरूषो दूरादेव हि शोभते ।
किंवदन्ती कृतार्थास्मिन् देशे भारत संज्ञके ।।
आर्यवर्णितानां गुणानामन्यतमोऽपि न लभ्यते भारतीयेषु ।
उत्पश्यामि बलवत्पतनमेतेषाम् ।"

शिष्याला नारदांनी भारतीयांच्या गुणाचे केव्हा तरी वर्णन करून सांगितले होते. त्या गुणांचा लवलेशाही त्याला भारतीयांच्यात दिसला नाही. म्हणून शिष्य म्हणतो. की आपण सांगितलेल्या गुणांपैकी कोणताही गुण भारतीयांजवळ नाही. उलट भारतवासीयांचे घोर पतनच झालेले दिसून येते.

संस्कृत भाषेची, संस्कृत संस्थांची स्थिती ही अनाथ वृध्द स्त्रियांप्रमाणे चिंतनीय झाली आहे, असे नारदाचे म्हणणे आहे.

" आसां चापि स्थितिरनाथवृध्दवनितानामिव चिन्तनीया ।"

" या देशातील असंख्य तपस्वी, ब्राह्मण आणि सद्गृहस्थ रक्षणाच्या बाबतीत कांहीच का करीत नाहीत ?" या शिष्याच्या प्रश्नावर नारदाचे उत्तर मर्मभेदी आहे. नारद म्हणतात. तपस्वी श्रीमंत मठाधीश बनलेत, कांही ब्राहमण जीविकाहीन तर कांही पतीत आहेत. गृहस्थ आळशी आहेत. आणि ते वाईट लोकांचे साहाय्यक बनलेत. विदेशी शिक्षणाच्या साहाय्याने स्वसंस्कृतीचे रक्षण अशक्य आहे. आणि येथे सध्या अशी अवस्था आहे की, कोणी एखादा काशीला अध्ययनासाठी निघाला तर तो मूर्ख ठरतो, मात्र पॅरिस, बर्लिनला जाणा-यांना आधुनिक, सभ्य म्हटले जाते.

या नाटकात राजकीय सत्तेची स्पष्ट शब्दात निंदा केली आहे. आणि भ्रांत भारताचे वास्तव चित्रण केले आहे.

- समानमस्तु वो मनः ।

डॉ. ग. बा. पळसुले

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भाषानुसारी राज्य पुर्नरचना करण्याचे ठरले. त्यावेळी भारतामध्ये जी परिस्थिती निर्माण झाली, त्या पार्श्वभूमीवर या नाटकाची रचना केलेली आहे. प्रादेशिक भाषेचा अभिमान कांही ठराविक प्रमाणात योग्य आहे. परंतु त्याला जेव्हा अवास्तव महत्व दिले जाते. तेव्हा ते राष्ट्राच्या दृष्टीने घातक ठरते. त्यादृष्टीने एकात्मता अखंडित राहावी म्हणून बहुभाषिक असलेल्या या देशाची एकच राष्ट्रभाषा असली पाहिजे, की ज्यामुळे विविधतेतून एकता साधली जाते- हे सर्व लोकांच्या मनावर बिंबविण्यासाठी हे नाटक अत्यंत उपयुक्त ठरते. आम्ही जरी विविध भाषांचे, धर्माचे, पंथांचे असलो तरी आमची मने सदैव एक राहोत. एकाच राष्ट्रहिताच्या विचाराने प्रेरित होवोत हे तत्त्व वाचकांना आकलित व्हावे हा लेखकाचा नाटयलेखनाचा हेतू आहे.

पहिल्या अंकात जेव्हा कृष्णकांतांच्या घरी त्यांचे भिन्न भाषिक स्नेही येतात, तेव्हा गावातील स्वातंत्र्योत्सव समारंभाचे वर्णन करताना बारूआ गांधींच्या अहिंसा व सत्याग्रहामुळे आपल्याला स्वातंत्र्य मिळाले म्हणतात. गांधींच्या विषयीचा आदर त्यांच्या भाषणातून व्यक्त होतो. परंतु ज्यांनी ज्यांनी स्वातंत्र्य यज्ञात आपल्या सर्वस्वाच्या आहुती दिल्या अशा ज्ञात-अज्ञात क्रांतिकारकांचे कृष्णकांत ऋण मानतात. या देशसेवकांना विसरून चालणार नाही, याबाबत मात्र सर्वांचेच एकमत आहे. या प्रसंगातून या सर्व मित्रांच्या मनातील भारताविषयींची निष्ठा स्पष्ट होते.

भाषावार प्रांतरचनेच्या गदारोळात या सर्वांच्यात मतभेद निर्माण होतात. प्रत्येकाला आपलीच भाषा सर्वश्रेष्ठ आहे असे वाटते. अखेरीस राष्ट्रभाषेचे महत्त्व, देशाच्या एकतेचे, अखंडतेचे महत्त्व सर्वांना पटवून देण्यात कृष्णकित यशस्वी होतात व हे भिन्न भाषिक मित्र पुन्हा एक होतात. या नाटकाचे भरतवाक्य परिणामकारक आहे.

"जयतु भारतो महान् ।
हिमशिखरावलि किरीटमाली सिन्धुधौतपदयुग्मवान् ।।
गङ्गा यमुना सिन्धुमातृकः सस्यश्यामलित कान्तिमान् ।।
हिन्दुमुस्लिमख्रिस्तपारसिक सहवसतिवरः सुमहान् ।।
सहिष्णुतायाः कुलभवनं यो कृत समन्वितान् वादान् ।
अनेकतायां एकतां दिशन् महान् क एतावान् ?
"सर्वेऽपि सुखिनः सन्तु सर्वे सन्तु निरामयाः ।
सर्वे भद्राणि पश्यन्तु मा कश्चिद् दुखःमाप्नुयात् । "
जपन्निमं कल्याणं मन्त्रं जयतु भारतो महान् ।।

भाषाशैली

इंग्रजी साहित्याचा व अर्वाचीन काळाचा संस्कृतवर पडलेला प्रभाव :-

परिवर्तनशीलता हे भाषेचे वैशिष्टय आहे. नवनवीन शब्दप्रयोग होत असलेले प्रत्येक भाषेमध्ये आढळतात. सर्वच भाषा एकमेकींच्या संपर्कात आल्याने त्यांच्यामध्ये शब्दाचा विनिमयही होत असल्याचे दिसून येते. एखादी भाषा दुस-या भाषेतील शब्द स्वीकारते किंवा दुस-या भाषेची सदृश नवे शब्द निर्माण करते, त्याची डॉ. हिंदकेसरींच्या मते चार प्रमुख कारणे आहेत.

1. तदर्थवाचक शब्दांचा अभाव
2. तदर्थवाचक शब्दांचे अज्ञान
3. अतिपरिचयामुळे दुस-या भाषेतील शब्दांचा वापर
4. विनाकारणच एखाद्या भाषेतील शब्दांविषयी वाटणारी आपुलकी.

संस्कृत भाषादेखील याला अपवाद नाही. आधुनिक संस्कृत साहित्यामधून मूळ संस्कृतमध्ये नसलेले अनेक शब्द आढळतात. हे शब्द विशेषत: उर्दू, हिंदी आणि इंग्रजी शब्दांना पर्यायी शब्द म्हणून वापरलेले दिसून येतात. याचे कारण उघड उघड आहे की आपल्या देशावर मुस्लीम आणि इंग्रज लोकांनी अनेक वर्षे राज्य केले. इंग्रजांचा तर आपल्यावर अत्यंत प्रभाव आहे. अतिशयोक्ती नव्हे तर वस्तुस्थिती आहे, की आपल्याला आपल्या भावना व्यक्त करताना स्वत:च्या मातृभाषेतील शब्द चटकन आठवत नाहीत, मात्र इंग्रजी शब्द सतत आपल्या जिभेवर घोळत असतात.

प्राचीन संस्कृत वाङ्मयात उल्लेख नसल्याने इंग्रजी, हिंदी, उर्दू शब्दांचे तदर्थवाचक शब्द नव्याने निर्माण करावे लागलेले दिसून येतात. मात्र अतिपरिचयामुळे इंग्रजी-हिंदी शब्द संस्कृत वाङ्मयात वापरलेले दिसून येत नाहीत. तसेच काही देश, शहरे, व्यक्ती यांची नावे संस्कृतकरण करून योग्य रूपे वापरली जाताना दिसतात.

संख्यालेखन पध्दतीतील बदल

"अङ्कानां वामतो गति:" या सूत्रानुसार संस्कृतमध्ये संख्या लिहिण्याची पध्दत इतर भाषांच्या उलटी आहे. प्राचीन संस्कृत किंवा मध्ययुगातील संस्कृत साहित्यामध्ये संख्या उजवीकडून डावीकडे वाचली जाते किंवा अक्षरी संख्या लिहितानादेखील उजवीकडून डावीकडे अंकांचा क्रम घेतला जातो. मात्र मराठी, इंग्रजी किंवा हिंदीतून डावीकडून उजवीकडे संख्या वाचली जाते. उदा. 1992 ही संख्या मराठीत एकोणीसशे ब्याण्णव किंवा एक हजार नऊशे ब्याण्णव अशी वाचली जाते. इंग्रजीमध्ये नाइंटिन नाइंटी टू अशी तर हिंदीमध्ये उन्नीससौ बयानब्बे (बयानवे) अशी वाचली जाते मात्र संस्कृतमध्ये ती द्वानवनवएकमिते

ख्रिस्ताब्दे किंवा द्वानवत्यधिकनवशतोत्तरै कसहस्त्रमिते ख्रिस्ताब्दे अशा पध्दतीने वाचली जाते. परंतु इतर भाषांच्या अनुकरणाने "एकोनविंशति शतोत्तरद्वानवति" अशा प्रकारे वाचण्याची पध्दती आधुनिक संस्कृतमध्ये रुढ होऊ लागली आहे.

महिन्यांची नावे :

वास्तविक आपल्या भारतीय सौर वर्षानुसार चैत्र,वैशाख वगैरे महिन्यांची नावे आहेत. जुन्या संस्कृत साहित्यात ती दिसतात. परंतु इंग्रजांच्या संपर्कानि आपण इंग्रजी महिन्यांचा कालगणनेसाठी वापर करण्यास सुरुवात केली. इंग्रजी महिन्यांची कालगणना इतकी अंगवळणी पडली आहे की कित्येकांना भारतीय सौर वर्षातील महिन्यांची नावे ओळीने आठवतदेखील नाहीत. इंग्रजी महिन्यांचे संस्कृतकरण आवश्यक होण्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे इंग्रजांच्या राजवटी पासून केवळ ऐतिहासिकच नव्हे तर सर्वच क्षेत्रातील महत्त्वाच्या घटनांच्या नोंदी इंग्रजी कालगणनेनुसार झालेल्या आहेत. त्यामुळे संस्कृतमध्ये जानेवारीचे जनवरीमास:,फेब्रुवारीचे फरवरी मास: अशा प्रकारे शब्दप्रयोग रुढ झाले.

त्याचप्रमाणे इतर देशांची,नगरांची,व्यक्तींची नावेदेखील संस्कृतमध्ये थोडयाफार बदलाने रुढ झाली. याशिवाय नवनवीन लागलेले,लागत असलेले शोध व त्यामुळे निर्माण होणारी शब्दसंपदाही संस्कृतमध्ये आहे. वैद्यक,विज्ञान,क्षेत्रात अशा शब्दांची भरपूर भर संस्कृत शब्दकोशात पडू लागली आहे. परंतु येथे त्यांचा विचार अनावश्यक असल्याने केवळ आपल्याला राष्ट्रीय प्रेरणा देणा-या संस्कृत साहित्यामुळे संस्कृत शब्दकोशात कोणत्या नवीन शब्दांची भर पडली त्याचा विचार करणे योग्य होईल.

नवशब्द निर्मितीच्या बाबतीत पंडिता क्षमा राव यांनी संस्कृत भाषेला दिलेली शब्दाची देणगी अनमोल आहे.

व्यावहारिक व राजकीय शब्द –

रजिस्ट्री – लेखपत्र	रुमाल – हस्तवस्त्र
money bag – धनकोश	Round Table Conference–चक्रगोष्ठी समारम्भ,
खादी – खद्दराम्बर,	Dominion status – सालम्बनस्वराज्य
Railway line – लोहमार्ग शलाका	Railway – धूमयान
Railway Station – लोहमार्गगृह	टांगा – तुरङगरथ:
Ticket. – अभिज्ञान पत्र	Arrest – प्रधर्षण
शिपाई – पुररक्षी	गोळी चालविणे – गुलिकावृष्टि:

मिठाचा कायदा – लावणो नय:	जहाज – यन्त्रयान:
चरखा – तन्तुचक्र	मशीद – मुसलिममन्दिर
तिरंगी झेंडा – त्रिवर्ण पताका,	बॉम्ब – बम्बास्त्र,

देशांची नावे – शहरांची नावे

जर्मनी – शर्मण्यदेश:,	पुणे – पुण्यपुरी,
वर्धा – वरदानगर,	अहमदाबाद – अम्दाबादपूर,
अहमदनगर – अहम्मदपूर	राजकोट – राजदुर्ग,
मद्रास – मद्रपुरी,	त्रिवेंद्रम – त्रिविंदर,
कॅनडा – कानडा,	अमेरिका – अमरीक ,
आफ्रिका – अपरीक,	युरोप – इरोप,
लाहोर – लवपुरी,	धरसाना – धार्सनग्राम.

व्यक्तींची नावे –

सुखटणकर – सुखटङ्कर,	राऽगन – रैगन,
रेनॉल्ड – रेनल्ड,	मॉन्टेगू – मान्तेगु,
मॅक्डोनल्ड – माक्डोनल्ड,	लजपतराय – लज्पत,

"भ्रांतभारतम्" मध्ये अनेक भाषांमधील शब्द आले आहेत उदा. हैट, तैण्ट, बोतल, होटल, चुरुट, नौकरी, पागल, बरांडी (ब्रॅन्डी), मखमल, पार्सल, भाभी.

काही काही ठिकाणी हिंदी लोकोक्तींचा वापरही केला आहे. उदा. भूखा बंगाली भात भात ।

अशोक अकलूजकर यांच्या लेखात एअर होस्टेससाठी गगनगृहिण्या आणि ओव्हरकोट: हे नवे शब्द आले आहेत.

"गान्धिगीता" मध्ये श्री ताडपत्रीकरांनी वापरलेले काही नवे शब्द–

अमेरिका – आम्रका,	माऊंट बॅटन – मांट बाटन,

ॲटमबॉम्ब – अणुप्रहरणास्त्र, बायबल – बैबल,

श्री चितळे यांनी इंग्रजी सन लिहिण्याच्या पध्दतीचा स्वीकार केला आहे. इंग्रजी महिन्यांची, अधिका–यांची, बादशहांची नावे कोणतेही बदल न करता जशीच्या तशी वापरली आहेत.

"धन्यो ऽहं धन्यो ऽहं" या नाटकात श्री पळसुले यांनी शब्दच नव्हे तर इंग्रजी वाक्ये–

MR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

देखील घातलेली आहेत. उदा.कम इन प्लीज । नाईस आयडिया । एनजॉय दि सी ब्रीज । आय ॲम सॉरी । यू मीन दॅट ।

हॉल, हॅट, ओव्हरकोट असे इंग्रजी शब्द तर भरपूर प्रमाणात दिसतात.

"क्रांतियुध्दम्"या पुस्तकात श्री बागेवाडीकरांनी वापरलेले नवे शब्द पुढीलप्रमाणे आहेत -

तोफेचा गोळा - आग्नेयगोल:,	दारु - आग्नेयचूर्णम्,
काडतूस - गुलिकावेष्टनम्,	काडतूस - गुलिकास्त्रम्,
तोफ - गुलिप्रक्षेपणी, गोलप्रक्षेपणी, बृहन्नाल:,	जरीपटका झेंडा - जर्झरम्,
तात्या टोपे - टोपी तातार्य:,	नानासाहेब पेशवे - पेशवे नानार्य:,
तोफखाना - बृहन्नालवाहिनी,	बंदूक - लोहनाडी , लोहसुषि:

महात्मायानम् या श्री केदार कवींच्या पुस्तकात बूमरॅंग साठी बूमराङग आणि व्हाइसरॉयसाठी प्रतिराजा, अपील - पुनर्न्याय, गिरणीमालक - यन्त्रिकास्वामिन:, फॅशन - शैली असे पर्यायी नवे शब्द दिसतात. शिवाय काही इंग्रजी शब्द जसेच्या तसेच वापरलेलेही दिसतात उदा. ट्राम, कोट, पॅन्ट, बूट, रेलमार्ग, सिग्रेट, चर्च, हॉटल.

'गान्धिचरितम्'या पुस्तकात टेलिग्रामसाठी तन्त्रीसंदेश हा शब्द वापरलेला आहे.

अशा प्रकारे आधुनिक संस्कृत साहित्यिकांच्या भाषेवर इंग्रजी आणि हिंदीचा परिणाम झालेला दिसून येतो.

एकंदरीत या प्रकरणात उल्लेखिलेल्या साहित्यामधून संस्कृत भाषेचे गतवैभव, एकेकाळी असलेले तिचे महत्त्व तर समजतेच शिवाय तिच्यापाशी असलेल्या ज्ञान-भांडारांची देखील कल्पना येते. सध्याच्या तिच्या दुरावस्थेची कारणे आणि तिला पुन्हा पहिले स्थान मिळवून देण्यासाठी करावयाचे उपाय यांची कल्पनाही येते.

– सं द र्भ –

1.	प्रश्नावलीविमर्शः	पृष्ठ 9
2.	--"--	पृष्ठ 20
3.	--"--	पृष्ठ 20
4.	--"--	पृष्ठ 21
5.	--"--	पृष्ठ 23
6.	--"--	पृष्ठ 56
7.	किमर्थं संस्कृतम्	पृष्ठ 2 सावधानम्
8.	--"--	पृष्ठ 6,7
9.	--"--	पृष्ठ 8,9
10.	--"--	पृष्ठ 9,10
11.	--"--	पृष्ठ 11
12.	--"--	पृष्ठ 31,32
13.	संस्कृत भाषा	1 / 1
14.	--"--	2 / 1,2
15.	--"--	2 / 5
16.	--"--	3
17.	--"--	6
18.	--"--	7
19.	--"--	11 / 1
20.	--"--	12
21.	--"--	12 / 6